

महाराष्ट्रातील हजारो गावांची तहान, आकाशाकडे नाही..

तर टँकरच्या चाकांकडे...? पान 2

दैनिक **अक्षराज** अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २६८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१० मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# तमिळनाडूत थलपती सरकार! सस्पेन्स संपला, शपथविधीचा मुहूर्त ठरला



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, चेन्नई :** तमिळनाडूत थलपती विजय यांच्या सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. अभिनेते ते नेते असा प्रवास करणाऱ्या विजय यांनी शनिवारी राजभवनात जाऊन राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची भेट घेतली. टीव्हीके पक्षाचे प्रमुख असलेल्या विजय यांनी राज्यपालांच्या भेटीत सत्ता स्थापनेचा दावा केला. विजय यांनी याआधी तीनवेळा राज्यपालांची भेट घेतली होती. अखेर चौथ्या भेटीत बहुमताचा पेच सुटला आहे. विजय उद्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील.

तमिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर विजय सातत्यानं राज्यपालांच्या भेटी घेत होते. पण त्यांना सत्ता स्थापनेचं आमंत्रण मिळालं नव्हतं. अखेर शनिवारी विजय सरकारचा मार्ग मोकळा झाला. यानंतर विजय राज्यपालांच्या भेटीला पोहोचले. विधानसभा निवडणुकीत १०८ जागा जिंकत विजय यांचा टीव्हीके राज्यातील सर्वात मोटा पक्ष ठरला. पण बहुमताच्या आकड्यापासून ते दूर राहिले.

तमिळनाडूत सत्ता स्थापनेसाठी ११८ आमदारांचा पाठिंबा गरजेचा आहे. टीव्हीकेनं १०८ जागा जिंकल्या. पक्षप्रमुख विजय २ मतदारसंघांतून विजयी झाले. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या विजय यांच्या पक्षाचे १०७ आमदार आहेत. यामुळे बहुमतासाठी आणखी ११ आमदारांचा पाठिंबा गरजेचा होता. काँग्रेस आणि डाव्या पक्षांनी विजय यांना पाठिंबा दिला. या पक्षांचं एकत्रित संख्याबळ ९ इतकं आहे. यामुळे टीव्हीकेकडे ११६ आमदारांचं बळ होतं. त्यांना आणखी २ आमदारांचा पाठिंबा गरजेचा होता.

व्हीसीके पक्षानं शनिवारी संध्याकाळी त्यांची भूमिका जाहीर झाली. पक्षानं विजय यांना पाठिंबा जाहीर केला. व्हीसीकेचे २ आमदार आहेत. व्हीसीकेच्या पाठिंबा पत्रानं गेम फिरला आणि विजय यांनी बहुमताचा आकडा गाठला. यानंतर आययूएमएलनंदेखील विजय यांना समर्थन दिलं. त्यांचे २ आमदार आहेत. यामुळे विजय यांच्या समर्थक आमदारांचा आकडा १२० वर गेला आणि सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झाला.

तमिळनाडू विधानसभा निवडणुकीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. पहिल्यांदाच विधानसभा निवडणूक लढत असलेल्या विजय यांच्या पक्षानं प्रस्थापित पक्षांना धक्का देत तब्बल १०८ जागा जिंकल्या. पण बहुमतापासून त्यांचा पक्ष दूर राहिला. अखेर काँग्रेस आणि अन्य लहान पक्षांच्या साथीनं विजय यांनी बहुमतासाठी आवश्यक असलेल्या आकड्यांची जुळवाजुळव केली. अखेर पाच दिवसांनी तमिळनाडूतील सत्ता पेच संपुष्टात आला आहे.

# त्या २६ शेतकऱ्यांना नोकरी द्या... उच्च न्यायालयाचे वेकोलीला आदेश...



**अक्षराज : चंद्रकांत भोयर**

**दि.०९, राजुरा (चंद्रपूर) :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एक महत्त्वपूर्ण निर्णय देत वेकोलीला स्पष्ट निर्देश दिले आहेत की, संपादित जमिनीबाबत दिवाणी न्यायालयात प्रलंबित वाद असल्याचे कारण देऊन नोकरीची प्रक्रिया थांबविणे कायदेशीरदृष्ट्या चुकीचे आहे. जमीन संपादित झालेल्या दिवशी सातबारा अभिलेखावर ज्यांची नावे नोंद होती, त्या मूळ मालकांच्या वारसांनाच मोबदला आणि नोकरीचा अधिकार असून, केवळ कोर्टातील खटल्याचे कारण देऊन त्यांना नोकरीपासून दूर ठेवता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले. याचिकाकर्त्यांच्या बाजूने ॲड. दीपक चटप यांनी न्यायालयात युक्तिवाद केला. दरम्यान ॲड.चटप यांनी ६१ प्रकरणे दाखल केली असून त्यातील २५ प्रकरणात वेकोलीच्या उत्तरानंतर दिलासा मिळाला आहे. इतर प्रकरणात वेकोलीला उत्तर दाखल करण्यास अजून दोन महिने वेळ मिळाला आहे.

ॲड.दीपक चटप यांनी वेकोली अधिग्रहणानंतर दाखल झालेल्या दिवाणी खटल्यांचा आधार घेत वर्षानुवर्षे नोकरी रोखत असल्याचे निदर्शनास आणून दिले. न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य करत वेकोलीला नोकरीसंदर्भातील आदेश जारी करण्याचे निर्देश दिले.

या निर्णयामुळे नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या संबंधित शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. वेकोलीकडून केवळ प्रलंबित खटल्याचे कारण देत सातत्याने होणारी टाळाटाळ न्यायालयाने थांबवली असून संबंधित शेतकऱ्यांच्या हक्काच्या नोकरीचा मार्ग खुला झाला आहे. या निर्णयाचे स्वागत करत ॲड.दीपक चटप म्हणाले, शेतकऱ्यांची जमीन संपादित करून त्यांना नोकरी देणे ही वेकोलीची कायदेशीर जबाबदारी आहे. कोर्ट केसचे कारण देऊन अनेकांना वर्षानुवर्षे त्रास दिला जात होता. उच्च न्यायालयाचा निर्णय हा शेतकरीहिताचा आणि न्याय पुनर्स्थापित करणारा आहे. वेकोलीची बाजू ॲड. इशांत तांबी यांनी मांडली. वेकोली न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे पडताळणी करून पात्र उमेदवारांना नोकरी देणार असल्याचे त्यांनी मान्य केले.

# आज ठाणे - वाशी मार्गावर ५ तास रेल्वेसेवा बंद राहणार



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०९, ठाणे :** मुंबई आणि उपनगरात लोकल ट्रेनने प्रवास करणाऱ्या सर्व नागरिकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. गेल्या रविवारी नीट परिक्षेच्या कारणास्तव मेगाब्लॉक घेण्यात आला नव्हता. पण या रविवारी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे.

रेल्वेच्या पायाभूत सुविधांची देखभाल आणि सुरक्षिततेसाठी हा देखभाल ब्लॉक नियमित घेण्यात येतो. यामुळे होणाऱ्या गैरसोयीबद्दल रेल्वे प्रशासन दिलगीर आहे, असं मध्य रेल्वे प्रशासनाकडून प्रसिद्धीपत्रक जारी करुन सांगण्यात आलं आहे. रेल्वे प्रशानाकडून प्रसिद्धी पत्रक जारी करुन मेगा ब्लॉकबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

मध्य रेल्वे, मुंबई विभागात आज म्हणजे रविवारी १० मे रोजी विविध अभियांत्रिकी आणि देखभाल दुरुस्तीची कामे करण्यासाठी आपल्या मुख्य मार्गावर माटुंगा आणि मुलुंड दरम्यान आणि ट्रान्स-हार्बर मार्गावर ठाणे आणि वाशी स्थानकांदरम्यान मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे, अशी माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

दरम्यान मध्य रेल्वेच्या माटुंगा आणि मुलुंड स्थानकांच्या मध्ये, अप आणि डाउन जलद मार्गांवर सकाळी ११.०५ ते दुपारी ३.४५ पर्यंत असेल, असं जाहीर करण्यात आलं आहे. याचाच अर्थ दोन्ही बाजूने हा मेगा ब्लॉक असेल. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी १०.३६ ते दुपारी ३.१० पर्यंत सुटणाऱ्या डाउन जलद मार्गावरील सेवा माटुंगा स्थानकावर डाउन धीम्या मार्गावर वळवण्यात येतील. या गाड्या माटुंगा आणि मुलुंड स्थानकांदरम्यान आपल्या नियोजित थांब्यांनुसार थांबतील आणि नियोजित वेळेपेक्षा १५ मिनिटे उशिरा पोहोचतील. ठाण्या पलीकडील जलद गाड्या मुलुंड स्थानकावर डाउन जलद मार्गावर वळवण्यात येतील, असं प्रशासनाकडून जाहीर करण्यात आलं आहे.

ठाणे येथून सकाळी ११.०३ ते दुपारी ३.३८ पर्यंत सुटणाऱ्या अप जलद मार्गावरील गाड्या मुलुंड स्थानकावर अप धीम्या मार्गावर वळवण्यात येतील. या गाड्या मुलुंड आणि माटुंगा स्थानकांदरम्यान त्यांच्या वेळापत्रकानुसार थांबतील, माटुंगा स्थानकावर पुन्हा अप जलद मार्गावर वळवण्यात येतील आणि नियोजित वेळेपेक्षा १५ मिनिटे उशिरा पोहोचतील, असंही रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे.

अप आणि डाउन ट्रान्स-हार्बर लाईन वरील ठाणे आणि वाशी/नेरुळ स्थानकांदरम्यान सकाळी ११.१० ते दुपारी ४.१० पर्यंत ब्लॉक असेल. ब्लॉक कालावधीत वाशी/नेरुळ आणि ठाणे स्थानकांदरम्यान अप आणि डाउन ट्रान्स-हार्बर लाईन वरील सेवा रद्द राहतील. ठाणे येथून सकाळी १०.३५ ते सायंकाळी १६.०७ पर्यंत वाशी / नेरुळ / पनवेल येथे जाणाऱ्या डाउन लाईन सेवा आणि पनवेल / नेरुळ / वाशी येथून सकाळी १०.२५ ते सायंकाळी १६.०९ पर्यंत ठाण्याकडे जाणाऱ्या अप लाईन सेवा रद्द राहतील.

# मंद्रूप ग्रामपंचायतीच्या हलगर्जीपणामुळे इंद्रानगरमधील नागरिक त्रस्त...



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०९, सोलापूर :** मंद्रूप ग्रामपंचायतीच्या वतीने हद्दवाढ भागातील इंद्रानगर परिसरात गटर खोदकाम करण्यात आले असून, तब्बल महिनाभर उलटूनही सदर गटर उघड्यावरच सोडण्यात आल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गटरचे काम अर्धवट अवस्थेत असल्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः लहान मुले खेळताना उघड्या गटरमध्ये पडण्याची भीती पालकांना सतावत आहे. तसेच रात्रीच्या वेळी अंधारामुळे अपघात होण्याची शक्यता अधिक वाढली आहे.

स्थानिक नागरिकांनी ग्रामपंचायतीकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

नागरिकांनी तात्काळ गटरचे काम पूर्ण करून परिसर सुरक्षित करावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा ग्रामपंचायत कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा स्थानिकांकडून देण्यात आला आहे.

# शरद पवारांनी केलेलं वक्तव्य सत्य करुन दाखवलं !

## विकास लवांडेंवरील शाईफेक हल्ल्यानंतर सुषमा अंधारेंची तिखट प्रतिक्रिया



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर संग्राम भंडारे यांच्याकडून शाईफेक हल्ला केल्याची घटना घडली. यावेळी आपणास धमकीही देण्यात आल्याचं लवांडे यांनी सांगितलं. या शाईफेकीचा व्हिडीओ समोर आला असून तो सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यानंतर, शाईफेक करणारे संग्राम भंडारे आणि अक्षय कांचन यांच्यासह १० ते १२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरीकडे या घटनेवरुन राजकीय वातावरणही तापलं आहे. महाविकास आघाडीतील नेत्यांनी या घटनेचा निषेध नोंदवला. तर, सुषमा अंधारे यांनी विकास लवांडेंचं अभिनंदन केलंय.

**सुषमा अंधारे नेमकं काय म्हणाल्या?**

सुषमा अंधारे यांनी ट्विट करुन विलास लवांडे यांच्यावर झालेल्या हल्ल्यामुळे शरद पवारांनी केलेलं वक्तव्य सत्य असल्याचं उघड झाल्याचं म्हटलं आहे. सुषमा अंधारे म्हणाल्या की, 'कामक्रोधमधमोहमत्सर या पासून संत संप्रदाय प्रचंड लांब असतो. संत तुकोबाराय संत ज्ञानेश्वर यांचा सांप्रत समाजाने अतोनात छळ केला मात्र उपरोक्त संतांनी कधीही कुणाचे अहित चिंतले नाही. माणूस विकार मुक्त झाला पाहिजे यासाठी ते कायम सम्यक विचार मांडत राहिले. आज आपल्या सोबत जे काही आळंदीत घडले हा एका अर्थाने आपला विजय आहे. कारण वारकरी संप्रदायाच्या नावाखाली झालेली घुसखोरी आणि ज्यांना वारकरी संप्रदायाचा नेमका विचारच कळला नाही. अशा नकली लोकांचे बुरखे फाडण्यात आपण यशस्वी झालात. वारकरी संप्रदायामध्ये हिंसक विचारांच्या लोकांची घुसखोरी झाली आहे हे पवार साहेबांचे म्हणणे या मंडळींनी पुन्हा एकदा खरे करून दाखवले', असं सुषमा अंधारे यांनी म्हटलं.

**'शुद्ध वेडेपणा आहे'**

पुढे त्या म्हणाल्या की, 'आता आपण अजून एक काम करूया. अशा लोकांवर पोलीस कारवाई व्हावी किंवा कायदेशीर त्याच्यावर गुन्हे दाखल व्हावे अशी कुठलीही अपेक्षा मागणी आपण कुणीही करू नये. कारण जिथे राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांचा एफ आय आर लिहून घेतला जाऊ शकत नाही आणि यावर त्यांच्याच पत्नी असणाऱ्या उपमुख्यमंत्री, किंवा खासदार मुलगा , चकार शब्दाने बोलू शकत नाही अशा राज्यात आपण आपली एफ आय आर व्हावी यासाठी प्रयत्न करणे शुद्ध वेडेपणा आहे', असंही अंधारे यांनी म्हटलं आहे.

'उलट जे जे लोक अशा पद्धतीच्या कृती करतात त्यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी वेगवेगळ्या समारंभांमध्ये पहिल्या रांगेच्या खुर्च्यांमध्ये बसवावे. त्यांचे पद्मश्री पद्मभूषण पद्मविभूषण असे पुरस्कार देऊन सत्कार समारंभ घडवून आणावेत. शक्य झालं तर सत्तेतल्या काही लाभाच्या जागा त्यांच्यासाठी उपलब्ध करून देता येतात का? हे सुद्धा बघावे. प्रवीण गायकवाड यांच्यावर शाई फेकणारे असतील किंवा हनुमंत पवारला मारहाण करणारे असतील किंवा तुम्हाला दहापेक्षा दाखवणारे लोक असतील अशा सगळ्या लोकांना अधिकाधिक राजाश्रय कसा मिळेल आणि त्यांचा सत्कार सन्मान कसा होईल यासाठी उलट आपण मुख्यमंत्री फडणवीस साहेबांकडे सगळे मिळून मागणी करूया...', असं सुषमा अंधारे यांनी ट्विटमध्ये म्हटलं आहे.

# परभणी जिल्ह्यात खासगी शाळा व कोचिंग क्लासेसच्या मनमानीमुळे पालक हैराण

**अक्षराज प्रतिनिधी**

**दि.०९, परभणी :** परभणी जिल्ह्यातील खासगी शाळा आणि कोचिंग क्लासेसच्या वाढत्या मनमानीमुळे पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. शिक्षणाच्या नावाखाली वाढती फी, जबरदस्तीची पुस्तके, क्लासेससाठी दबाव आणि फक्त टॉपर विद्यार्थ्यांनाच महत्त्व देण्याच्या प्रकारामुळे सामान्य पालक आर्थिक आणि मानसिक तणावाखाली आले आहेत.काही खासगी शाळांमध्ये फक्त हुशार विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित केले जात असून, इतर विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार पालकांकडून होत आहे. टॉपर विद्यार्थी शाळेच्या जाहिरातीसाठी वापरले जातात, तर बाकी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष केले जाते, असा आरोपही पुढे येत आहे.तसेच अनेक शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना खासगी कोचिंग क्लासेसमध्ये प्रवेश घेण्यासाठी अप्रत्यक्ष दबाव आणला जात असल्याची चर्चा आहे. काही ठिकाणी शाळा आणि क्लासेस यांच्यात संगनमत असल्याचाही आरोप पालक करत आहेत.दरवर्षी पुस्तके, गणवेश, वह्या आणि इतर साहित्य विशिष्ट दुकानातूनच खरेदी करण्यासाठी पालकांवर दबाव टाकला जातो. यामुळे शिक्षणाचा खर्च प्रचंड वाढला असून गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांची आर्थिक कोंडी होत आहे.

शिक्षण मंदिर राहिले नसून बाजारपेठ बनत चालली आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया अनेक पालकांनी व्यक्त केली. जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाने खासगी शाळांच्या फी व नियमांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

परभणी जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रात सुरू असलेल्या कथित एज्युकेशन माफियाविरोधात पालकांनी एकत्र येण्याची गरज असल्याचेही मत व्यक्त केले जात आहे.




## प्राधिकरणाचा 'विकास' कधी?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तीन दिवसांपूर्वी 'छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण'सह राज्यातील अन्य प्राधिकरणांची आढावा बैठक झाली. स्थापना होऊन बराच काळ उलटला असला तरी छत्रपती संभाजीनगरच्या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला म्हणावे तसे बळ सरकारने दिलेले नाही. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिकसह मोठ्या शहरांतील प्रकल्पांना बळ दिले जाते. मात्र राजकीय उदासीनतेमुळे छत्रपती संभाजीनगरसह प्राधिकरणातील ३१३ गावे, झालर क्षेत्रातील २८ गावांचा नियोजनबद्ध विकास महापालिका, सिडको, एमआयडीसी, म्हाडा, झालर क्षेत्र आदी वेगवेगळ्या पाच प्राधिकरणांच्या कात्रीत अडकला आहे.

छत्रपती संभाजीनगरसाठीच्या प्राधिकरणाची चर्चा २०१६ पासूनच सुरू झाली. १ मार्च २०१७ रोजी आजच्या 'छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण'ची स्थापना झाली. प्रशासकीय, विकासात्मक आणि नियोजनात्मक अशा तीन पद्धतीनुसार विकासकामांना अधिक गती येईल असे सांगण्यात आले. परंतु, आजही हे प्राधिकरण पूर्ण क्षमतेने सुरू नाही.

राज्यात मुंबईसाठी एमएमआरडीए, पुण्यासाठी पीएमआरडीए, तर नागपूरसाठी एनएमआरडीए अशी प्राधिकरणे आली. छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थापले तरी त्याकडे दुर्लक्ष केल्यागत स्थिती आहे. ३० नोव्हेंबर २०१८रोजी प्राधिकरणाच्या कामकाजासाठी तात्पुरत्या स्वरुपात ४९ पदे निश्चित करण्यात आलेली होती. प्राधिकरणाचे एकूणच विस्तारीत कामकाज विचारात घेता सुमारे दीडशे पदांच्या सुधारित आकृतीबंधास १३ सप्टेंबर २०२४ रोजी मान्यता देण्यात आली. परंतु, ना पुरेसे अधिकारी, ना कर्मचारी ना निश्चित अशी जागा अशी स्थिती आहे.

प्राधिकरण ही मोठी शहरे व त्याच्या आसपासच्या उपनगरांचा नियोजित आणि सर्वांगीण विकास करणारी विशेष नियोजन संस्था समजली जाते. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधा विकास आदी कामे प्राधिकरणाकडून अधिक वेगाने होतील अशी भाबडी आशा सर्वसामान्यांना आजही आहे. परंतु, राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे 'छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण'ला म्हणावे तसे बळ मिळत नाही. प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात छत्रपती संभाजीनगर, खुलताबाद, गंगापूर, वैजापूर, पैठण तालुक्यांतील एकूण ३१३ गावांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे प्राधिकरणाकडे या गावांच्या नियोजनात्मक पायाभूत विकासाची जबाबदारी आली. विकास परवानगी, अनधिकृत बांधकाम प्रतिबंध व निर्मूलन आदी कामकाजही प्राधिकरणाकडे येते. परंतु, प्राधिकरणच सक्षम नसेल तर विकास काय, असा प्रश्न उपस्थित होतोच. यासोबतच अनधिकृत बांधकामांना आळा, विकास परवानगी अशा कामांसाठीही अडचणी येत असतात असा अनुभव प्राधिकरणातील गावांच्या धुरिणांना येतोच.

आज शहरात महापालिका, सिडको, एमआयडीसी, म्हाडा यांच्यासह झालर क्षेत्र अशा छोट्या-मोठ्या प्राधिकरणांची हद्द येते. इतकी प्राधिकरणे असल्याने हद्दीचा वादही अनेकदा दिसतो. त्यात झालर क्षेत्रात २८ गावे आहेत. या गावांचाही नियोजनबद्ध विकास याच कात्रीत अडकला आहे. छत्रपती संभाजीनगरच्या औद्योगिक विकासामुळे रोजगाराच्या शोधात इतर जिल्ह्यांसह परराज्यातील हजारो नागरिक छत्रपती संभाजीनगरमध्ये स्थलांतरीत झाले. विस्ताराच्या तुलनेत, वाढत्या शहरीकरणाच्या तुलनेत शहरातील पायाभूत सुविधांचा म्हणावा तसा विस्तार, विकास झालेला नाही. नागरी सुविधांवरील ताण वाढतो आहे. पायाभूत सुविधांसह पाणी पुरवठ्याचा प्रश्नही भेडसावतो. अशा वेळी प्राधिकरणामुळे विकासाला काही गती येईल, अशी आशा निर्माण झाली. परंतु, तसे आजपर्यंत तरी झालेले दिसत नाही. महानगर प्रदेश प्राधिकरणाचा विकास कधी होणार? विकासाची प्रतीक्षा कधी संपणार?


**- मकरंद कुलकर्णी**

# आईची माया-आईची थोरवी...

दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी जागतिक मातृदिन अर्थात जागतिक आईदिन साजरा केला जातो.यावर्षीचा जागतिक मातृदिन १० मे रोजी रविवारी मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे.या मातृदिनाच्या निमित्ताने आपण सगळ्यांनी आपापल्या आईच्या चरणांवर नतमस्तक होऊन आईचे ममत्व आणि आईची थोरवी जाणून घेऊया...

आई,माय,माता,माई,जननी,जन्मदा आणि जन्मदात्री ही आईसाठी संबोधने वापरले जातात.आई मायेचा व करुणेचा सागर असते. आई संस्कारांची खाण असते.आई प्रत्येकाच्या घरातील चालते बोलते विद्यापीठ असते.आई प्रत्येकाचा पहिला गुरु,आई ममतेचा वटवृक्ष आणि आई जीवनाचा आधार असते.आई जन्म देते,आई प्रेम देते,आई संस्कार शिकवते,आई जीवन साकारते आणि आईच जीवनाचे सोने करते.आईमुळे श्वास मिळतो,आईमुळे जीवनाचा खरा अर्थ कळतो आणि आईकडून संकटांचा मुकाबला करण्याचे पाठबळ मिळते. आई प्रत्येकाची सारखी असते,घराचे घरपण असते,आई कुटुंबाचा आधार असते,आईशिवाय लेकरांचे एकही पान हलत नाही.आई घरात असली की घर भरून दिसते आणि आईविना घर कसे सुनेसुने वाटते.

अनेक कविंनी त्यांच्या कवितेतून आई साक्षात रेखाटली आहे.आईची माया, आईचे



थोरपण,आईचे कर्तृत्व,आईचा त्याग आणि आईचा खोटा राग अतिशय सुंदर व भावनिक शब्दांमध्ये कविंनी वर्णिला आहे.कवी यशवंत,कवी ग्रेस, माधव ज्युलियन,फ.मु.शिंदे आणि साने गुरुजी यांनी त्यांच्या लेखणीतून आईचं मोठेपण अचूक,भावनिक व हृदयस्पर्शी काव्यांतून रेखाटले आहे.विद्यार्थी दशेत असताना व शालेय शिक्षणात आई या कवितांचे वाचन करताना आपण अक्षरशः रडलो आहोत हे कोणीही नाकारू शकत नाही.कारण आई ही आईच असते,तिची जागा कोणीही घेऊ शकत नाही.अशावेळी आपणाला 'तू कितनी अच्छी है,कितनी भोली है,प्यारी प्यारी है,ओ माँ ओ माँ' हे गाजलेले हिंदी गीत नक्कीच आठवते आणि आपण भावूक होऊन जातो.

जागतिक मातृदिन साजरा करताना राजमाता जिजाऊ,अहिल्याबाई होळकर,माता हिरकणी,सावित्रीबाई फुले,माता भिमाई,माता रमाई आंबेडकर,श्यामची आई,अनाथांची माय सिंधुताई सपकाळ आणि मंदाकिनी आमटे या मातांचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही.या सर्व मातांनी व आयांनी जे जे ऐतिहासिक,सामाजिक,शैक्षणिक व लोकोपयोगी कार्य केले आहे त्याला तोड नव्हती.त्यांच्या अलौकिक कार्याचे मोल आपण आजही जाणतो आणि म्हणूनच आपण अंतर्मुख होऊन त्यांना विनम्र अभिवादन करतो.

जागतिक मातृदिन साजरा करताना माझी आई कौशल्याबाईचे कर्तृत्व सांगितल्या शिवाय मला राहवत नाही. आम्हा भावंडांच्या शिक्षणासाठी माझ्या आईने वडिलांसोबत विहिरी,तळे व बराशी खोदल्या आहेत,डोक्यावरून माती वाहून नेण्याचे काम केले आहे. मुंबई येथील रेती बंदरात वाळू उपसण्याचे अवघड काम माझ्या आईने केले होते.तिच्या अशा अमाप कष्टांमुळे आम्ही उच्च शिक्षण शिकून मोठ्या पदांवर नोकरीला लागलो,वडिलांना तोलामोलाची साथ देत माझ्या आईने आमच्या जीवनाचे सोने केले आहे.

अशी कष्टाळू,मायाळू,दयाळू आणि कनवाळू आई प्रत्येकाची आई असते. फक्त गरज आहे प्रत्येकाने आईची माया आणि आईची थोरवी जाणून घेण्याची. आपण कितीही मोठे झालो तरी,आपण कर्तृत्ववान निपजलो तरीही आईच्या उपकारांची परतफेड कधीच करू शकत नाही.वृद्ध आईला जीव लावा,तिच्याशी मनमोकळे बोला,तिला जीवापाड जपा. आजारी आईला तात्काळ दवाखान्यात नेऊन चांगल्या डॉक्टरांकडून उपचार करा.आई हयात असेपर्यंत तिची मनोभावे सेवा करा.

मातृहृदयी कवी मारोती डाखोरे त्यांच्या कष्टकरी आईबद्दल अतिशय भावनिकतेने लिहितात-

जरी फाटका पदर,तुझ्या शोभे डोईवर
कणखर हाताने तू,उभा झाकला संसार
दिसं पाहण्या सोन्याचा,तिची ओढाताण सारी
सुख ओढून आणायला,ठरलेली रोजंदारी...

आज रोजी साजरा होत असलेल्या जागतिक मातृदिनानिमित्त जगातील सर्व मातांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा व त्यांच्या चरणांवर साष्टांग दंडवत!

**- बबन दामोदर गुळवे**
**मुख्याध्यापक, जि.प.प्रशाला खंडाळी**
**ता.अहमदपूर, जि.लातूर**

# महाराष्ट्रातील हजारो गावांची तहान, आकाशाकडे नाही..तर टँकरच्या चाकांकडे...?

मे महिन्याच्या उन्हाने यंदा जमिनीबरोबर राज्याच्या कारभारातील पोकळ दाव्यांनाही चटके दिले आहेत. एकीकडे उष्णतेची लाट अंग भाजत आहे, तर दुसरीकडे महाराष्ट्रातील हजारो गावांची तहान आता आकाशाकडे नाही, तर टँकरच्या चाकांकडे लागली आहे.

राज्यातील सुमारे १६०० गावे आणि वाड्यावस्त्यांना तब्बल ४६६ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात आहे, ही बाब राज्याच्या जलव्यवस्थापनाच्या अपयशाची जाहीर कबुली आहे. धरणांतील पाणीसाठा ३७ टक्क्यांवर येऊन ठेपला आहे आणि कोयना धरणासारख्या राज्याच्या ऊर्जा नाडीतील जलसाठाही चतुर्थांशावर आल्याने परिस्थिती किती गंभीर आहे, याची जाणीव होते. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात पाण्यासाठी गावोगावी टँकर धावणे हे अनेक दशकांच्या दुर्लक्षाचे, राजकीय बेफिकीरीचे आणि नियोजनशून्य विकासाचे फलित आहे. महाराष्ट्रात दरवर्षी पाऊस पडतो, पण तो साठवला जात नाही. निसर्ग पाणी देण्यात कंजूष नाही; मात्र शासन ते जपण्यात अपयशी ठरले आहे. राज्यातील अनेक भागांत सरासरीपेक्षा चांगला पाऊस होऊनही उन्हाळा आला की पाणीटंचाईचे संकट उभे ठाकते. कारण पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्याऐवजी ते वाहून जाऊ दिले जाते. जलसंधारणाच्या योजना कागदावर रंगवल्या जातात; प्रत्यक्षात मात्र तलाव गाळाने भरलेले, नाले अतिक्रमणांनी बुजलेले आणि विहिरी कोरड्या पडलेल्या दिसतात. 'जलयुक्त शिवार'सारख्या योजनांचे मोठा गाजावाजा झाला, हजारो कोटी रुपये खर्च झाल्याचे दावे झाले; पण आजही मराठवाडा, विदर्भ, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक गावे टँकरवर अवलंबून असतील, तर त्या योजनांची परिणामकारकता प्रश्नांकित ठरते.

पाणीटंचाईचे मूळ केवळ कमी पावसात नाही, तर पाण्याच्या अन्याय्य आणि बेजबाबदार वापरातही आहे. महाराष्ट्रातील उपलब्ध पाण्यापैकी तब्बल ७० ते ८० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते. त्यातही उसासारख्या अतिपाणीखाऊ पिकाला प्राधान्य दिले जाते. मराठवाड्यासारख्या कोरडवाहू भागात ऊस कारखानदारीचा विस्तार हा जलनियोजनाच्या विरोधातील सर्वात मोठा विनोद आहे. एका बाजूला शेतकरी आणि सामान्य नागरिक पाण्यासाठी वणवण फिरत असताना दुसऱ्या बाजूला राजकीय पाठबळ असलेल्या साखर कारखान्यांना मुबलक पाणी उपलब्ध करून दिले जाते. पाण्याचे हे राजकारणच आजच्या संकटाला कारणीभूत ठरले आहे. पाणी हे जीवनाचे साधन राहिले नसून सत्ता आणि पैशाचे हत्यार बनले आहे. शहरांतील परिस्थितीही फार वेगळी नाही. नागरीकरणाच्या वाढत्या वेगाने पाण्याची मागणी प्रचंड वाढली; पण त्या प्रमाणात जलस्रोत निर्माण झाले नाहीत. महानगरांमध्ये पाईपलाईनमधून होणारी पाण्याची गळती, अनधिकृत वापर आणि असमान वितरण यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जाते. काही शहरांत दररोज लाखो लिटर पाणी गळतीमुळे नाल्यात जाते, तर उपनगरांतील नागरिकांना आठवड्यातून एकदा पाणी मिळते.

पाणीपुरवठा हा मूलभूत हक्क असताना तो आज नशिबाचा खेळ ठरत चालला आहे. राज्य सरकारकडून दरवर्षी उन्हाळ्यापूर्वी जलआराखड्यांचे

**रविवार विशेष !**

दावे केले जातात. बैठकांमध्ये सादरीकरणे होतात, अधिकाऱ्यांच्या फेरफटक्यांचे फोटो प्रसिद्ध होतात; पण उन्हाळा सुरू झाला की पुन्हा टँकर, दुष्काळ आणि तहान यांचीच पुनरावृत्ती दिसते. प्रशासनाचे नियोजन इतके कमकुवत आहे की, एप्रिलच्या चौथ्या आठवड्यात ३२१ असलेले टँकर काही दिवसांतच ४६६ वर जातात आणि सरकारला त्याचे आश्चर्य वाटते. हवामान बदल, उष्णतेच्या लाटा आणि कमी होणारे जलसाठे यांची माहिती आधीपासून असताना सरकारने पूर्वतयारी का केली नाही? जलसंकट हे अचानक कोसळलेले वादळ नाही; ते हळूहळू वाढणारे संकट आहे. तरीही प्रत्येक वर्षी शासनाची धावपळ शेवटच्या क्षणीच का सुरू होते ? पाणीपुरवठा विभागाच्या योजना अनेकदा

घोषणांपुरत्याच मर्यादित राहतात. ग्रामीण भागात पाईपलाईन टाकल्या जातात; पण त्यात पाणीच नसते. कोट्यवधींच्या योजनांचे भूमिपूजन होते; पण त्या पूर्णत्वाला जात नाहीत. काही ठिकाणी जलशुद्धीकरण प्रकल्प उभे राहतात; पण वीजेअभावी बंद पडतात. गावागावांत नळजोडण्या दिल्याचा गाजावाजा होतो; मात्र नळातून पाणी येत नसल्याने महिलांना पुन्हा विहिरींवर रांगा लावाव्या लागतात. 'हर घर जल'च्या घोषणा वास्तवाच्या धुळीत हरवतात. योजनांचा केंद्रबिंदू लोकांचा पाणीहक्क नसून ठेकेदारी आणि राजकीय प्रसिद्धी बनल्याने हा प्रश्न अधिक बिकट झाला आहे. याहूनही गंभीर बाब म्हणजे पाण्याच्या प्रश्नाकडे अजून अजूनही आपत्कालीन त्कालीन समस्येप्रमाणे पाहिले जाते; दीर्घकालीन धोरण म्हणून नाही. टँकर पाठवणे हा उपाय असू शकतो, पण ते उत्तर नाही. टँकर म्हणजे प्रशासनाच्या अपयशावर मारलेली तात्पुरती फुंकर. पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडवण्यासाठी जलसंधारण, भूजल पुनर्भरण, नदीजोड प्रकल्पांचे वैज्ञानिक पुनर्मूल्यांकन, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि पीकपद्धतीतील बदल या सर्व बाबींवर कठोर निर्णय घ्यावे लागतील. ग्रामीण भागात छोटे बंधारे, शेततळी आणि पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन याला प्राधान्य द्यावे लागेल. शहरांमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी लागेल. सांडपाण्याची पुनर्प्रक्रिया करून औद्योगिक वापरासाठी त्याचा पुनर्वापर वाढवणे अत्यावश्यक आहे. भविष्यातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे हवामान बदल. महाराष्ट्रात पावसाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. कमी दिवसांत अतिवृष्टी आणि उर्वरित काळात दीर्घ कोरडेपणा, हे नवीन वास्तव बनत आहे. त्यामुळे पारंपरिक जलनियोजन आता पुरेसे राहणार नाही. जलव्यवस्थापनाला हवामान बदलाच्या संदर्भात नव्याने आकार द्यावा लागेल. जलस्रोतांचे डिजिटल मॅपिंग, भूजल पातळीचे रिअल-टाईम निरीक्षण, जलवापराचे नियमन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक अधिकार देणे, या गोष्टी काळाची गरज बनल्या आहेत.

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो. मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर.**

## श शपथ

मंत्रीमंडळ शपथविधी
न रहावा उपचारविधी
सिंहासनावर बसताना
संविधान जाणा आधी

लोकशाही नाळ जोडा
दारी आली सुवर्णसंधी
हक्काहून श्रेष्ठ कर्तव्य
नको नशिली सत्ताधुंदी

उपकार जनांचे स्मरावे
त्यांनी ही दिधली गादी
मालक न नौकर आहो
जनसेवक सार्थ उपाधी

ज्यांनी जितवले युध्द
स्मरणांत रहावी प्यादी
बोले तैसा चाले जाणा
कुणा ना लावावे नादी

महोत्सव हा करताना
नकोउन्माद हवी शुध्दी
सामावून घ्यावे विरोधी
विस्तारुन मनाची रूंदी

विधायक कार्या जुडावे
आता संपवा वादावादी
अभिनंदन खुल्यामनाने
कार्यक्षम राहो विरोधी

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

## उन्हाळी शिबिरांची उपयुक्तता किती असते?

वार्षिक परीक्षा संपून सुट्ट्या सुरू झाल्या की जिकडे तिकडे उन्हाळी शिबिरांची रेलचेल सुरू होते. प्रत्येक ठिकाणी गायन, वादन, नाट्य, अभिनय, नृत्य, साहसी खेळ जसे ट्रेकिंग, स्विमिंग अशा विविध विषयांशी निगडित शिबिरांचे आयोजन केले जाते. पालक ही आपल्या मुलांना परीक्षा संपल्या की उन्हाळी शिबिरात दाखल करतात. खरंतर उन्हाळी सुट्टीत मुलांनी मस्त मजा करावी, मित्र मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळावे, बागडावे, मैदानी खेळ खेळावेत, आवडीची पुस्तके वाचावीत, मामाच्या गावाला किंवा खेडेगावात जाऊन निसर्ग अनुभवावा, गड किल्यांची भटकंती करावी. मुलांनी त्यांची सुट्टी एन्जॉय करावी. पण असे करण्याऐवजी पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबीराच्या दावणीला बांधतात. मुलांचा कल, मुलांची आवड न पाहता पालक आपल्या मुलांना उन्हाळी दाखल करतात. वाढत्या स्पर्धेच्या युगात आपला मुलगा अभ्यासासोबतच इतर कलागुणांमध्येही मागे राहू नये म्हणून पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करतात पण ही उन्हाळी शिबिरं आपल्या मुलांसाठी किती उपयुक्त आहेत या उन्हाळी शिबिरांचा मुलांना खरंच उपयोग होतो का? याचा विचार मात्र पालक करीत नाहीत. उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेबाबत आयोजक गंभीर आहेत का याचाही विचार पालकांनी करावा कारण तीन वर्षांपूर्वी म्हणजे कोरोनाच्या आधी पुण्यात एका शिबिरात मुळशी धरणात पोहायला गेलेल्या तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला होता. या घटनेमुळे उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पालकांनीही आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करण्यापूर्वी शिबिरातील सुरक्षा व्यवस्थेची खात्री केली पाहिजे. या शिबिरांना शासनाची मान्यता आहे का याचीही खात्री करायला हवी. सरकारनेही आयोजकांची क्षमता व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करूनच अशा शिबिरांना मान्यता द्यायला हवी. शिबिरादरम्यान जर काही दुर्घटना घडली तर त्या दुर्घटनेस आयोजकांनाच जबाबदार धरले पाहिजे. काही शिबिरांना मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त असतो तर काहींना अल्प प्रतिसाद मिळतो अर्थात या शिबिरातून सर्वच गोष्टी शिकायला मिळतात असे नाही. याउलट वर्षभर चालणाऱ्या विविध शिबिरातून मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सुट्टीच्या दिवसातील शिबिरांना बऱ्यापैकी पैसे मोजावे लागतात. टीव्ही, मोबाईल, व्हिडीओ गेममध्ये डोके खुपसून बसण्यापेक्षा पैसे जात असले तरी मुले गुंतून राहत असल्यामुळे पालक हाही खर्च सहन करतात. पालकांचा हेतू उदात्त आहे मात्र पालकांनी मुलांच्या आवडीनिवडी जपाव्यात. आपल्याला हवे तसे नको तर मुलांना हवे ते देण्याचा, शिकवण्याचा प्रयत्न करावा. एकूणच या शिबिरांची आपल्या मुलांना कितपत गरज आहे याचा विचार करूनच पालकांनी आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करावे.

**- श्याम ठाणेदार, ९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## साईकृपा विद्यालय चिंतालधाबा दहावीचा निकाल ९४ टक्के

**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.०९, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** साई कृपा विद्यालय चिंतालधाबा येथील माध्यमिक शालत प्रमाण पत्र परीक्षा मार्च २०२६ चा निकाल उल्लेखनीय लागला असून विद्यालयाने ९४ टक्के निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे विद्यालया चा निकाला मुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यालयातील १) गौरव विनोद मोरे ८६.६० टक्के मिळवून प्रथम क्रमांक पटकवला द्वातीया क्रमांक २) शर्वरी संतोष सोनटक्के ८६.२० वा तृतीय क्रमांक ३) प्रज्वल भारत तोरे ८४.६० टक्के मिडवून पटकवला त्यांचा यशा बदल शिक्षक पालक व ग्रामस्त काढून अभिनंदन करायन्यात येत आहे विध्यारत्याचा मेहनती ला शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन लाभल्यामुळे विद्याल्याने समाधान कारक निकाल नोंदविला आहे.

निकाल जाहीर होताच विद्यालय परिसरात आनंदों त्सव साजरा करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले असून त्यांचा पुढील शैक्षणिक वाटचाली साठी शुभेच्छा देण्यात आले आहे. विद्यालयाचा यशा बदल मुख्याधपाक शिक्षकरुंद व पालकाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## धनोजे कुणबी समाज बाबुपेठ शाखेच्या वतीने प्राची जोगी (देवडे) यांचा सत्कार



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** धनोजे कुणबी समाज उपशाखा बाबुपेठ (चंद्रपूर) च्या वतीने प्राची विवेक जोगी (देवडे) यांना औद्योगिक क्षेत्रातील महाराष्ट्र उद्योजक पुरस्कार, राष्ट्रपती पुरस्कार, शिवरत्न पुरस्कार, तेजस्विनी पुरस्कार त्यांना मिळाल्याबदल समाजाच्या वतीने त्यांच्या घरी जाऊन त्यांना सम्मान चिन्ह व शाल श्रीफळ देऊन त्यांच्या सत्कार करण्यात आला.

धनोजे कुणबी समाजाने माझ्या कामाचा सन्मान केला आहे. या पुरस्कारामुळे नवी उमेद प्राप्त झाली आहे. भविष्यातील माझ्या नव्या संकल्पनांना प्रोत्साहन मिळाले आहे. या ऊर्जेवर पुढील काळात मला अधिक चांगले आणि आदर्शवत काम उभे करण्यास मदत होणार आहे. सामाजिक जाणीव ठेवून काम करणारी एक व्यावसायिक म्हणून झालेल्या या गौरवाने माझी जबाबदारी वाढली आहे. असे मत प्राची जोगी(देवडे) यांनी व्यक्त केले

धनोजे कुणबी समाजाचे उपाध्यक्ष संजय ढवस यांनी मनोगत व्यक्त करताना स्पष्ट केले कि, कुणबी समाजातील उद्योजक मोठ्या प्रमाणात विविध क्षेत्रात आपला लौकिक वाढवत आहेत. संघटन कौशल्य, धोका पत्करण्याची तयारी आणि दूरदृष्टी हे गुण उद्योजकांनी आत्मसात करायल हवेत. कुणबी समाजातील उद्योजकांना एकत्र आणण्यासाठी आणि व्यवसायाच्या नवीन क्षितिजांना स्पर्श करण्यासाठी व समाजातील तरुणांच्या हातात व्यवसायाची नवी ऊर्जा देत असताना त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा पाया मजबूत करण्यासाठी निश्चितच समाजाच्या वतीने प्रयत्न केले जातील, असे विचार व्यक्त केले.

याप्रसंगी प्रा. रविंद्र झाडे, ॲड. देवा पाचभाई, मुकेश गाडगे, मंगेश देरकर, सचिन ढेंगळे, अमोल मत्ते, रविंद्र वनसिंगे, हरिदास पिंगे , मंगेश बदकी, अरुण जोगी, कोमल मोहितकर, जयश्री वनसिंगे किरण पिंगे, तेजस्विनी पोडे, मोनाली ढवस, पुष्पलता मते, ललिता सोमलकर, वंदना जूनघरी, रेखा खोडे, जया वाघूलडे, अर्चना हिंगाने, मनीषा पायपरे, तारा जोगी व समाजबांधव उपस्थित होते.

## महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस तर्फे मिरा भाईंदरमध्ये १२ मे रोजी भव्य युवा मेळावाचे आयोजन

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०९, मिरा भाईंदर :** मिरा भाईंदर युवा काँग्रेस तर्फे प्रेस कॉन्फरेन्स दिनांक ८.०५.२०२६ रोजी सायं ४.३० वा घेण्यात आली त्यात मिरा भाईंदर मध्ये महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस तर्फे दिनांक १२ मे २०२६ रोजी येथे भव्य युवा केंद्रित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमात राज्य भरातील युवक नेते, सामाजिक कार्यकर्ते, विध्यार्थी, पत्रकार तसेच गिग वर्कर्स सहभागी होणार आहेत.

कार्यक्रमाला भारतीय युवक काँग्रेस चे राष्ट्रीय आध्यक्ष भानू चिब, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे, भारतीय युवक काँग्रेसचे सचिव व महाराष्ट्र प्रभारी अजय छिकारा, भारतीय युवक काँग्रेस च्या संयुक्त सचिव महाराष्ट्र सहप्रभारी शाम्भवी शुक्ला, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी चे उपाध्यक्ष व माजी मुझफर हुसेन यांच्या सह राज्यातील विविध भागातील युवा प्रतिनिधी उपस्थित राहतील. मिरा भाईंदर महानगरपालिका च्या नव नियुक्त विरोधी पक्ष नेत्या तसेच महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या उपाध्यक्षा सैय्यद आफरीन मुझफर हुसेन यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाचे आयोजन केले आहे. युवक सक्षमी करण, सामाजिक सहभाग आणि जन कल्याणसाठीची बाधिलकी दर्शवणारा हा कार्यक्रम मिरा भाईंदरच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासातील एक महत्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसतर्फे सर्व नागरिक, विध्यार्थी युवक, पत्रकार यांनी मोठया संख्येने उपस्थित राहून यशस्वी करावे, असे आवाहन करण्यात आले.

## महादुल्यात महानिर्मितीमध्ये नियुक्त झालेल्या उमेदवारांचा सत्कार



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** अलीकडे महानिर्मिती कंपनीमध्ये तंत्रज्- ३ या पदासाठी लेखी परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत ४०० जागेकारिता लाखो विद्यार्थी लाखो परीक्षार्थी सहभागी झाले होते. त्यातून नागपूर जिल्ह्यातील श्रीवास नगर, महादुला येथील ७ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.

क्रांतिवीर श्यामलाल बाबू श्रीवास स्मृती बहुद्देशीय संस्था, श्रीवास नगर महादुलातर्फे महानिर्मिती कंपनीमध्ये नियुक्त झालेले प्रवीण वानखेडे, विक्की खरवडे, रोशनी बानाबाकोडे, शुभम बोरकर, कृष्णा बोरकर, संदीप दमाहे, श्यामलाल लांजेवार यांचा सत्कार करून परिसरात वाजत गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली.

याप्रसंगी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सेवानंद शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद बायस्कर, पोलीस उपनिरीक्षक तुषार नवले, संस्था अध्यक्ष राजेश मछली, नगरसेवक गोपालसिंग नैकाने, नगरसेवक प्रितम लोहासारवा, संस्था पदाधिकारी पुरण आगासे, मुन्ना मेश्राम, नमिता गोडबोले, विनोद आगासे, माधव लाडे, रेखा वानखेडे, मंदा मोटघरे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन संस्था सचिव अमरजीत गोडबोले यांनी केले. तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रवीण वानखेडे, राजेश बोरकर, राहुल इंगोले, प्रितेश वानखेडे, निरंजन वालदे, अभिजीत इंगोले, कमलेश खोब्रागडे, प्रवीण घोडेस्वार, प्रफुल नारनवरे, अश्विन डोंगरे आदींनी परिश्रम घेतले.

# दिव्यातील स्मशानभूमीची दुरवस्था; छताविना अंत्यसंस्कार, ग्रामस्थ संतप्त

## ठामपाचे दुर्लक्ष; लोकवर्गणीतून उभारला चौथरा, पण पावसात उघड्यावरच विधी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, दिवा (ठाणे) :** दिवा शहर पश्चिमेतील दिवा गावातील शासनमान्य स्मशानभूमी अखेरच्या घटका मोजत आहे. छताअभावी उन्हात-पावसात नागरिकांचे प्रचंड हाल होत असून, ठाणे महापालिकेच्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

**लोकवर्गणीतून उभारल्या सुविधा, पालिका मात्र सुस्त**

स्मशानभूमीची अवस्था बिकट झाल्याने अखेर ग्रामस्थांनीच पुढाकार घेतला. लोकवर्गणीतून मातीची भरणी करून, लोखंडी बर्नर व सिमेंटचा चौथरा उभारण्यात आला. मात्र, मूलभूत सुविधांकडे पालिकेने पाठ फिरवल्याने अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना उघड्यावरच उभे राहावे लागत आहे.

**पावसाळ्यात तर हालच विचारू नका !**

छत नसल्याने पावसाळ्यात अंत्यसंस्कार करणे अशक्य होते. महिला, वृद्ध, लहान मुलांना पावसात भिजत विधी पूर्ण करावे लागतात. उन्हाळ्यातही रखरखत्या उन्हात उभे राहण्याशिवाय पर्याय नाही.

**ग्रामस्थांचा सवाल : मृत्यूनंतर तरी सन्मान मिळेल का..?**

शासन दफ्तरी नोंद असूनही पालिका एक छत देऊ शकत नाही, ही शोकांतिका आहे. मृत्यूनंतर तरी सन्मानाने अखेरचा निरोप देता येईल का? असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत.

**पालिकेकडे मागणी**

स्मशानभूमीत तातडीने पत्र्याचे छत, पिण्यारच्या पाण्याची व्यवस्था, बसण्यासाठी बाकडे व विजेची सोय करावी, अशी जोरदार मागणी दिवा ग्रामस्थांनी केली आहे. पालिकेने तातडीने दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ही देण्यात आला आहे.



**काय आहे परिस्थिती?**

- कुठे : दिवा पश्चिम, दिवा गाव स्मशानभूमी
- नोंद : शासन दफ्तरी नोंदणीकृत
- समस्या : छत नाही, पाणी नाही, वीज नाही, बसायची सोय नाही
- उपाय : ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून बर्नर, चौथरा उभारला
- मागणी : ठामपाने त्वरित छत व मूलभूत सुविधा द्याव्यात

## काकणेवाडीत गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार योजनेचा शुभारंभ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील काकणेवाडी येथे महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत कामाचा शुभारंभ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते संपन्न झाला. जलसंधारण, शेती विकास आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार आहे.



### आमदार दातेंच्या हस्ते कामास सुरूवात

याप्रसंगी प्रदिप वाळुंज, सरपंच गिताराम वाळुंज, जयवंतशेठ वाळुंज, भास्कर वाळुंज सर, ज्ञानदेव वाळुंज, दगडु वाळुंज, बाळासाहेब वाळुंज, संदीप वाळुंज, मधुकर झावरे, मारुती वाळुंज, संपत वाळुंज, भाऊसाहेब वाळुंज, सोन्याबापु वाळुंज, ओंकार पुरी, प्रणव वाळुंज, भगवान वाळुंज, दत्तात्रय किसन वाळुंज, सुभाष वाळुंज, रविंद्र वाळुंज, लक्ष्मण वाळुंज, सुनिल वाळुंज, नामदेव वाळुंज, मंगेश वाळुंज, पोपट वाळुंज आदी मान्यवरांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या योजनेअंतर्गत धरणांमध्ये वर्षानुवर्षे साचलेला गाळ बाहेर काढून तो शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध करून दिला जातो. त्यामुळे धरणांची पाणी साठवण क्षमता वाढण्यास मदत होते, तर दुसरीकडे गाळामुळे जमिनीची सुपीकता वाढून शेती उत्पादनातही भरघोस वाढ होते. नैसर्गिक पोषक घटकांनी युक्त असलेला हा गाळ पिकांसाठी नैसर्गिक खताचे काम करत असल्याने रासायनिक खतांवरील खर्चातही मोठी बचत होणार आहे.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, पाणी हा भविष्यातील सर्वात मोठा प्रश्न असून जलसंधारण ही काळाची गरज आहे. गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार योजना ही केवळ धरण स्वच्छ करण्याची मोहीम नसून शेतकऱ्यांच्या समृद्धीचा आणि शाश्वत शेतीचा मार्ग आहे. धरणातील गाळ शेतात गेल्याने जमिनीची उत्पादकता वाढते, तर धरणात अधिक पाणीसाठा उपलब्ध होऊन भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यास मदत होते. शासनाच्या अशा लोकहिताच्या योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.

तसेच त्यांनी शेतकऱ्यांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन करत जलसंधारणाच्या कामात लोकसहभाग आवश्यक असल्याचे ही नमूद केले. आजची पाण्याची बचत ही उद्याच्या पिढीसाठीची मोठी गुंतवणूक आहे. गावागावात जलसंवर्धनाची चळवळ उभी राहिली तरच भविष्यातील पाणी प्रश्नांवर कायमस्वरूपी उपाय होऊ शकतो, असेही ते म्हणाले. मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणारी ही योजना राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये प्रभावीपणे सुरू आहे.

## सरकार ला राज्य परिवहन महामंडळामध्ये नोकर भरती करण्याची मागणी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०९, गुहागर (रत्नागिरी) :** राज्यातील सर्वच एसटी महामंडळाचे आगारात चालक व वाहक तसेच आवश्यक बससेस यांची कमतरता आहे यामुळे आगारातील अधिकारी यांना प्रवाशांना योग्य तो न्याय देता येत नाही. परिणामी राज्यातील आगारांची वेळापत्रक कोलंडली आहेत, रिबुक वर रिबूक मारून चालक व वाहक यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे अशा वेळी जर का मोठा अपघात घडला तर प्रवाशी जनतेची जबाबदारी कोण घेणार? असा प्रश्न गुहागर तालुका प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष पराग कांबळे यांनी उपस्थित केला आहे.

प्रवाशी जनतेतूनही एसटी सेवेबाबत सर्वत्र नाराजी आहे. सरकारला याचे काही पडलेले नाही. त्यामुळे राज्य सरकारने या बाबत गंभीर विचार करून राज्यातील एसटी महामंडळाचे आगारांना आवश्यक असणारी नोकर भरती व बसेस द्याव्यात अशी मागणी प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष पराग कांबळे यांनी सरकारकडे केली आहे.

राज्यात प्रत्येक तालुक्यात डेपो आहेत काही डेपोत चालक वाहक व गाडयाच नाहीत यामुळे दैनंदिन वेळा पत्रक कोलंडले आहे,परिणामी शालेय विद्यार्थी, नोकर वर्ग व व्यापारी सामान्य नागरिकांना मोठया समस्यांना सामोरे जावे लागत आहे याला सरकार जबाबदार आहे असे कांबळे यांनी म्हटलं आहे.

## नांदुर्डी हायस्कूलची उज्वल यशाची परंपरा कायम; विद्यालयाचा निकाल ९०.४१ टक्के

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, विंचूर (नाशिक) :** जनता विद्यालय, नांदुर्डीमराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्याजनता विद्यालय, नांदुर्डीयेथील विद्यार्थ्यांनी माध्यमिक शालांत परीक्षा (मार्च २०२६) मध्ये आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात विद्यालयाने९०.४१ टक्के यश संपादन केले आहे.विद्यालयातील एकूण १६७ विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यंदाही मुलींनी निकालात बाजी मारल्याचे दिसून येत आहे.

**निकालाची ठळक वैशिष्ट्ये :-**

* एकूण प्रविष्ट विद्यार्थी : १६७
* उत्तीर्ण विद्यार्थी : १५१
* विद्यालयाचा निकाल : ९०.४१%
* ८०% पेक्षा जास्त गुण : २३ विद्यार्थी
* विशेष प्राविण्य (Distinction) : ४५ विद्यार्थी
* प्रथम श्रेणी : ५० विद्यार्थी
* द्वितीय श्रेणी : ३९ विद्यार्थी
* पास ग्रेड : १७ विद्यार्थी
* विद्यालयातील 'टॉप ५' गुणवंत : १)कु. तनिषा विकास जगताप - ९१.२०% (प्रथम) २)कुमार प्रणव दीपक शिंदे- ९०.४०% (द्वितीय) ३)कु. पायल सोमनाथ जाधव- ८९.८०% (तृतीय) ४)कुमार उदय बापूराव निफाडे- ८९.६०% (चतुर्थ) ५)कु. पूर्वा अविनाश पंगे- ८८.८०% (पाचवा) ६)कु. रक्षा उमेश शिंदे- ८८.२०% (सहावा)

अभिनंदन आणि कौतुकया यशाबद्दल मविप्र समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ.सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, निफाड तालुका संचालक शिवाजी आप्पा गडाख, महिला संचालक शोभाताई बोरस्तेव सर्व संचालक मंडळाने विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. तसेच माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी प्रा.डॉ.भास्करराव ढोके, शालेय समिती अध्यक्ष, मुख्याध्याप कबी. डी.म्हसकर, पर्यवेक्षिका रणशूर आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## राजेंद्र चांदे यांची रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी निवड

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९,विंचूर (नाशिक) :** रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून, संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदीराजेंद्र चांदेयांची निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या लाईफ मेंबर सदस्यांमधून ही निवड करण्यात आली असून, त्यांच्यावर सोपवण्यात आलेल्या या नवीन जबाबदारीमुळे विंचूर परिसरासह शिक्षण क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. सातारा येथे दिनांक ०९ मे २०२६ रोजी झालेल्या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्षखा. शरदचंद्रजी पवारयांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड जाहीर करण्यात आली. यावेळी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे, खा. सुप्रियाताई सुळे, खा. रामशेठ ठाकूर, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. राजेंद्र चांदे यांनी आजवर रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केलेले शैक्षणिक आणि सामाजिक कार्य अत्यंत मोलाचे राहिले आहे. त्यांच्या याच निष्ठेची आणि कार्याची दखल घेऊन संस्थेने त्यांना या महत्त्वपूर्ण पदावर काम करण्याची संधी दिली आहे.चांदे सरांच्या निवडीबद्दल जनरल बॉडी सदस्य डॉ. सुजित गुंजाळ, उत्तर विभाग सल्लागार समिती सदस्य सुनील मालपाणी, स्थानिक सल्लागार समिती अध्यक्ष जगदीश जेऊघाले, उपाध्यक्ष कैलास सोनवणे, ज्येष्ठ सदस्य पंढरीनाथ दरेकर, अनिल दरेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# डोंबिवलीच्या जान्हवी कुलकर्णीने SSC परीक्षेत १०० टक्के गुण मिळवून रचला इतिहास



## आमदार राजेश मोरे यांच्या हस्ते सत्कार

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, डोंबिवली (ठाणे) :** शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंबिवली शहराने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची ताकद सिद्ध केली आहे. डोंबिवली पूर्वेकडील खएड चंद्रकांत पाटकर विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी जान्हवी वरदा वरुण कुलकर्णी हिने महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या SSC परीक्षा २०२६ मध्ये तब्बल १०० टक्के गुण मिळवत ऐतिहासिक व विक्रमी यश संपादन केले आहे. या अभूतपूर्व यशाने डोंबिवलीची मान महाराष्ट्रभर उंचावली आहे.

आई वरदा वरुण कुलकर्णी व वडील वरुण गजानन कुलकर्णी यांच्या संस्कार, मेहनत व मार्गदर्शनाची ही फलश्रुती आहे. जान्हवीने अभ्यासू वृत्ती, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे अभूतपूर्व यश मिळवले आहे.

या दैदिप्यमान यशामागे विद्यार्थिनीची मेहनत जितकी महत्त्वाची आहे, तितकेच मोलाचे योगदान खएड चंद्रकांत पाटकर विद्यालयाच्या उत्कृष्ट शैक्षणिक संस्कारांचे, दूरदृष्टी असलेल्या मार्गदर्शनाचे व विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता घडवणाऱ्या समर्पित शिक्षकवृंदाचे आहे.

जान्हवीच्या या शानदार यशाबद्दल कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी तिचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या सत्कार सोहळ्याला नगरसेवक हर्षल राजेश मोरे, नगरसेवक सुरज राजन मराठे, नगरसेविका दिपाली पाटील, संतोष चव्हाण, गजानन व्यापारी, अमोल भोगले तसेच स्वप्निल पंढरीशेठ पाटील हे मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी जान्हवीच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि सातत्याचे कौतुक करत जान्हवी इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श आहे. मेहनत असेल तर यशाचे शिखर गाठता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे जान्हवी, अशा शब्दांत तिचा गौरव केला.

जान्हवीच्या यशामुळे चंद्रकांत पाटकर विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, संपूर्ण डोंबिवली परिसरात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जान्हवीचे हे यश असंख्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. कुमारी जान्हवी वरदा वरुण कुलकर्णी हिला उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!

# खापरखेड्यात भव्य रक्तदान शिबिर; १३८ रक्तदात्यांचा सहभाग

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून शुक्रवार, दि.०८ मे रोजी खापरखेडा विज निर्मिती केंद्राच्या मनोरंजन सभागृह, क्लब क्र.०१ येथे सर्व कंत्राटी कामगार संघटनेच्या वतीने आयोजित भव्य रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले.

उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेच्या काळात रक्ताचा तुटवडा भासू नये व गरजू रुग्णांना वेळेत रक्त उपलब्ध व्हावे, या सामाजिक हेतूने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार, कंत्राटी कामगार तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिराचे उद्घाटन खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता विवेक रोकडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपमुख्य अभियंता नारायण राठोड, सचिन देगवेकर, अधीक्षक अभियंता दिनेशदत्त शुक्ला, विलास उके, शिरीष वितोंडे, वैद्यकीय अधीक्षक मुकेश गजभिये, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, सुरक्षा अधिकारी नवीनकुमार सत्तीवाले तसेच सुरक्षितता अधिकारी नितीन मोहोड, कॉन्टॅक्टर असोसिएशन खापरखेडाचे अध्यक्ष दिलीप बनसोड, सचिव दिवाकर घेर प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी रक्तदानाचे सामाजिक महत्त्व अधोरेखित करत नियमित रक्तदानासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. रक्तदान हेच श्रेष्ठ दान असल्याचे सांगत त्यांनी समाजातील प्रत्येक नागरिकाने वर्षातून किमान एकदा रक्तदान करावे, असे मत व्यक्त केले.



जीवन ज्योति रक्तपेढी, नागपूर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात एकूण १३८ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदात्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिबिराला विशेष यश मिळाले.

शिबिर यशस्वीतेसाठी कामगार नेते रोशन गोस्वामी, विनोद बनसोड, भूपेंद्र चतुर्वेदी, उमेश पारधी, प्रवीण हाते, मयुर तिरपुडे, कमलाकर खोडे, राधेश्याम केळेकर, विनोद भिंगारे, प्रकाश गेडाम आदींचे सहकार्य लाभले.

# गावाशी नाते अखंडीत ठेवणारे दादा कावरे यांचा अनोखा उपक्रम !

## डि.के.लॉजिस्टिक परिवार आयोजित रक्तदान शिबिरात १९८ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर शहरातील बुगेवाडी येथील रहिवासी तथा उद्योग व्यवसायाच्या निमित्ताने मुंबईत स्थायिक झालेले यशस्वी युवा उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते आणि पारनेर नगरपंचायत प्रभाग क्र. २ चे युवा नेतृत्व दादा कावरे यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत, आयोजित केलेल्या डि.के. लॉजिस्टिक परिवाराच्या भव्य रक्तदान शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल १९८ रक्तदात्यांनी रक्तदान करत सामाजिक बांधिलकीची जाणीव जागवली.

आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी युगात अनेकजण गाव सोडून शहरांकडे वळतात; मात्र काही माणसं अशी असतात की, यशाच्या शिखरावर पोहोचूनही आपल्या मातीतली नाळ कधी तुटू देत नाहीत. दादा कावरे हे त्यापैकीच एक नाव ठरत आहे. मुंबईतील व्यवसायातून मोठी ओळख निर्माण करत असतानाच त्यांनी आपल्या गावातील माणसांशी जिव्हाळ्याचं नातं कायम जपलं आहे.

डि.के.लॉजिस्टिक या व्यवसायाच्या माध्यमातून त्यांनी केवळ व्यावसायिक यशच मिळवलं नाही, तर अनेक युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देत सामाजिक जबाबदारीही पार पाडली आहे. सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात धावून जाणारे, मदतीचा हात पुढे करणारे आणि समाजासाठी सातत्याने कार्य करणारे युवा नेतृत्व म्हणून त्यांनी तालुक्यात स्वतःची वेगळी ओळख



**गावाकडून मुंबईपर्यंतचा प्रवास करताना स्वतः च्या मातीशी नातं जपणारे आणि समाजासाठी सतत झटणारे युवा नेतृत्व म्हणून दादा कावरे यांच्याकडे आज अनेक युवक प्रेरणास्थान म्हणून पाहत आहेत. रक्तदानासारख्या उपक्रमातून त्यांनी पुन्हा एकदा समाजासाठी जगणं म्हणजेच खऱ्या अर्थाने यशस्वी होणं हे दाखवून दिलं आहे.**

निर्माण केली आहे. खासदार निलेश लंके यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळख असलेल्या दादा कावरे यांनी यापूर्वीही अनेक समाजाभिमुख उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याचे खासदार लंके यांच्यासह मुंबई व परिसरातून मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे.

# घुग्घुस येथील राजीव रतन चौक पुलाच्या कामाची आ.जोरगेवारांकडून पाहणी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** घुग्घुस येथील राजीव रतन चौकात सुरू असलेल्या पुलाच्या बांधकामाची आज शनिवारी आ. किशोर जोरगेवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष पाहणी करत कामाचा सविस्तर आढावा घेतला. पुलाचे ९० टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झाले असून सध्या पॅचवर्क, अंतिम टप्प्यातील तांत्रिक कामे व इतर किरकोळ कामे शिल्लक आहे. हे काम तातडीने पूर्ण करून पुलीया रहदारीकारिता लवकर सुरु करण्याचे निर्देश यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी अधिकाऱ्यांना दिले आहे.

यावेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी निलेश राजनकर, वणी वेकोली एरियाचे मुख्य महाप्रबंधक करमरकर, महारेलचे श्रीकांत पंचवटी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता राठोड, भारतीय जनता पार्टीचे घुग्घुस शहराध्यक्ष संजय तिवारी, घुग्घुस नगर परिषदेच्या नगराध्यक्षा दिप्ती सोनटक्के, गटनेत्या मीना मोरपाका, नगरसेवक विवेक बोढे, आशिष मासिरकर, गणेश पिंपळकर, राजू रेड्डी, नगर सेविका वैशाली ढवस, आशा पानघाटे, पल्लवी घुले, सुनीता पेंदोर, स्वीकृत नगरसेवक निरीक्षण तांड्रा, नरुल सिद्दिकी, नगर बलराम डोडाणी, तुषार सोम, शेखर शेट्टी, नामदेव डाहुले, गणेश शेंडे, संतोष नुने, मुन्ना लोडे, विनोद चौधरी, पूजा दुग्गम, श्रीनिवास इसारप, राजकुमार गोडसेलवार, साजन गोहणे, भाजपा महिला आघाडी अध्यक्षा सुचिता लुटे, उषा अगदारी, सोनल भरटकर, नंदकिशोर यादव, चैताली सातपुते, रमन तांड्रा, राजपाल वर्मा, ओम महाकाली, राजेश मोरपाका, श्रीनिवास तालपेल्ली, सुनीता पाठील, लखन हेकरे, संजय वखाले, गणेश उईके, गौरव ठाकरे, मयूर कलवल, श्याम अगदारी, सुरज मोरपाका, तुळशीराम ढवस आदींची उपस्थिती होती.

चंद्रपूर मतदारसंघात विकासकामांचा वेग कायम ठेवत नागरिकांच्या दळणवळणाच्या सोयी अधिक सक्षम करण्यासाठी हा पुल अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आ. किशोर जोरगेवार यांनी यावेळी सांगितले. पुलामुळे परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असून नागरिकांना सुरक्षित, जलद व सुलभ प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.पाहणीदरम्यान आ. जोरगेवार यांनी पुलाच्या बांधकामाची गुणवत्ता, वापरण्यात आलेले साहित्य, सुरक्षा उपाययोजना, वाहतुकीच्या दृष्टीने आवश्यक सुविधा तसेच कामाची सद्यस्थिती याबाबत अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली.

कामामध्ये कोणतीही त्रुटी राहू नये तसेच नागरिकांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड होऊ नये, याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या. यावेळी पुलावरील उर्वरित कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश देत, पुल लवकरात लवकर वाहतुकीसाठी सुरू करण्यात यावा, असे स्पष्ट निर्देश आ. किशोर जोरगेवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. ट्रायल प्रक्रियेदरम्यान सर्व तांत्रिक बाबींची काटेकोर तपासणी करून आवश्यक दुरुस्त्या तातडीने पूर्ण करण्याचेही त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेच्या शाळांची उज्वल यशाची परंपरा कायम...



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** नागपूर ग्रामीण क्षेत्रात आपले नाविन्यपूर्ण उपक्रम, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्र, आधुनिक तंत्रज्ञान व शालेय शिस्त क्षेत्रात नावलौकिक असलेल्या महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेअंतर्गत कार्यरत खापरखेडा, सिल्लेवाडा, धापेवाडा व व्यायाड येथील शाळांनी नुकत्याच लागलेल्या दहावी माध्यमिक शालांत परीक्षेत आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवत घवघवीत यश प्राप्त केले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल व संस्थेचा नावलौकिक कायम राखल्याबद्दल संस्थेच्यावतीने चारही शाळेतील मुख्याध्यापकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

संस्थेअंतर्गत कार्यरत महाराष्ट्र विद्यालय सिल्लेवाडा या शाळेचा निकाल ९७.५० टक्के, महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय खापरखेडा या शाळेचा निकाल ९२.१७ टक्के, श्री. कोलबास्वामी विद्यालय धापेवाडा ९३.४० टक्के तर परमानंद विद्यालय व्याहाड या शाळेचा निकाल ८९.२८ टक्के लागला असून बारावी प्रमाणेच दहावीच्या परिक्षेतही विद्यार्थ्यांनी यशाची गगनभरारी कायम राखली आहे. माध्यमिक शालांत परीक्षेत संस्थेअंतर्गत एकूण ३९९ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले होते. तर एकूण विद्यार्थ्यांपैकी दहा टक्के विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य श्रेणी प्राप्त केलेली आहे.

संस्थेअंतर्गत सर्व शाळांमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांकरीता वर्षभर राबविण्यात आलेले अतिरिक्त वर्ग, तज्ज्ञ विषय मार्गदर्शन, सराव परीक्षा,बोर्ड पद्धतीने होणारे मूल्यांकन व आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत राबविण्यात आलेल्या परिक्षा पद्धतीचा निश्चित फायदा या निकालातून दिसून आलेला असून विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुधीर केदार कोषाध्यक्ष संध्याताई ठाकरे, सचिव सुहासताई केदार व सर्व पदाधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन करण्यात आले तर परिसरातील पालकांकडून विद्यार्थ्यांवर कौतूकाचा वर्षाव करण्यात येत आहे.

# ॲड.भूपेश पाटील समाजभूषण पुरस्काराने सन्मानित



**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.०९, चिमूर :** आंबेडकरी विचारवंत, प्रसिद्ध अधिवक्ता, साहित्यिक,वामनराव पाटील स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. भूपेश पाटील यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कर्मचारी संघटना, धामणगाव (रेल्वे) यांच्या वतीने समाजभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

धामणगाव (रेल्वे) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कर्मचारी संघटनेने आयोजित केलेल्या महामानवांच्या संयुक्त जयंत्युत्सव समारंभात भूपेश पाटील यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष संजय श्रीरामे,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. डॉ. रवींद्र मुंद्रे, रामदास पाटील उपस्थित होते.

भूपेश पाटील यांनी वामनराव पाटील स्मृती प्रतिष्ठानच्या माध्यमातून चिमूर आणि नागभीड तालुक्यातील दहावी, बारावी, नवोदय, शिष्यवृत्ती परीक्षा, उच्च शिक्षण घेणाऱ्या व परीक्षांत दैदिप्यमान यश मिळविणा-या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्काराचे व मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन केले. बुद्ध विहारांना बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाचे वितरण, ओबीसीच्या प्रश्नांसाठी ओबीसी हक्क परिषदेचे आयोजन, परिसरातील कवी, लेखकांना प्रोत्साहित करण्यासाठी बोलीभाषा साहित्य संवर्धन महामंडळाच्या माध्यमातून साहित्य संमेलनांचे आयोजन,चिमूर येथे २०१९ मध्ये सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत डॉ.श्रीपाल सबनीस यांचे उपस्थितीत पहिल्या अ.भा.आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे आयोजन, चंद्रपूर जिल्ह्यात चक्रवर्ती सम्राट अशोक आदर्श बुद्ध विहार स्पर्धेचे आयोजन करुन बुद्ध विहार समित्यांना नवी दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले. भूपेश पाटील यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# के.रामलू शाळेची १००टक्के निकालाची परंपरा कायम




**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०९, कुंडलवाडी :** कुंडलवाडी येथील के.रामलू पब्लिक स्कूलचा दहावीचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६च्या SSC बोर्ड परीक्षेत १०० टक्के निकाल लागला आहे. निकालाची ही उज्वल परंपरा कायम राखली आहे कुंडलवाडी येथील के. रामलू पब्लिक स्कूलचा दहावीचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६च्या महाराष्ट्र SSC बोर्ड परीक्षेत १०० टक्के निकाल लागला आहे. निकालाची ही उज्वल परंपरा कायम राखली आहे. प्रथम आलेले दोन विध्यार्थी श्रीराम राजेश्वर इंदूरकर व विवेक मुकेशकुमार जोशी या दोघांनाही सारखेच गुण मिळाले असून त्या दोघांना ९४.४० टक्के मिळाले तर द्वितीय आलेल्या महिमा हरीश देशपांडे ला ९१.८०टक्के तर, नरेश सायन्ना अटनमवार याला ९१.४०टक्के गुण मिळाले आहेत. शाळेच्या ५८ विद्यार्थ्यांनी यावर्षी दहावीची परीक्षा दिली होती.

यापैकी सर्व ५८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले त्यात ९०टक्के पेक्षा जास्त ४विध्यार्थी, ८०पेक्षा जास्त २२विध्यार्थी, ७०पेक्षा जास्त २१विध्यार्थी असे गुण मिळवले आहेत. जिल्हाधिकारी राहुल कर्डीले साहेबांनी राबवलेल्या कॉपीमुक्त अभियानात देखील या शाळेने आपली ८ वर्ष सतत १००टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. तालुक्यातील शाळांमध्ये उत्कृष्ट कामगिरीची परंपरा के. रामलू पब्लिक स्कूलने कायम राखली असून त्यासाठी संस्थेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्वांचेच योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार, सचिव यशवंत संगमवार, संचालिका रमा ठक्कुरवार प्रिंसिपल एस जाधव, व्हाय प्रिंसिपल एम सपना यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी, पालक,शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे. विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणातून उज्वल भविष्य घडवण्यासाठी संस्था कटिबद्ध राहील के.रामलू पब्लिक स्कूल भविष्यातही अशाच पद्धतीने उज्वल यशाची परंपरा कायम राखण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणातून उज्वल भविष्य घडवण्यासाठी संस्था कटिबद्ध असणार आहे असे प्रिंसिपल एस जाधव यांनी सांगितले.